लोकमत

# तुम्ही घरात बसला, तरच विजेता होणार

## नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशनच्यावतीने कोरोनाविषयी हटके आवाहन

कुलदीप घायवट ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एनएचआरसीएल)च्या वतीने तुम्ही घरात बसला, तरच विजेता होणार, असे आवाहन कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केले आहे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढू नये, यासाठी घरात बसून आपल्या बालपणातील खेळ खेळा, असा संदेश एनएचआरसीएल यांच्याकडून देण्यात आला आहे.

कोरोना विषाणूंमुळे देशात हाहाकार माजला आहे. दररोज मृत्यूचा आकडा वाढत आहे. कोरोनाचा संसर्ग होऊ नये, म्हणून सरकारने १४ एप्रिलपर्यंत लॉकडाउन घोषित केला आहे. प्रत्येक जण घरात बसून आहे. घरात बसून काय करायचे, असा प्रश्न प्रत्येकासमोर उभा राहिला आहे. टीव्हीवर मालिकांचे जुने भाग दाखविले जात आहेत. स्मार्ट फोनचा नेट धीम्या गतीने चालत आहे. प्रत्येकाने इनडोअर खेळ खेळण्यास प्राधान्य देण्यास सुरुवात केली आहे. एनएचआरसीएलच्यावतीने बालपणातील ल्युडो खेळाची आठवण करून दिली आहे. ज्याच्या सोंगट्या सर्वांच्या आधी घरात पोहोचतील, तो जिंकला, असा हा खेळ आहे. कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी तुम्ही घरात बसला, तरच विजेता होणार, असा संदेश एनएचआरसीएलच्यावतीने दिला आहे.

### सोशल मीडियावरुन आवाहन

प्रत्येकाने आपल्या लहानपणी ल्युडो हा खेळ खेळला असेल. पूर्वी चार जण हा खेळ पुठ्ठ्यावर खेळत असत. आता सहा जणांसह ल्युडो खेळ स्मार्ट फोनवर सर्रास खेळला जातो. या खेळात घरात जाण्याचे प्रत्येकाचे ध्येय असते. ज्याच्या सोंगट्या घरात सर्वांच्या आधी पोहोचतील, तो जिंकला. या खेळातून बोध घेत जो घरात बसून राहील, तोच कोरोनावर विजय प्राप्त करु शकेल, अशी माहिती एनएचआरसीएलच्यावतीने देण्यात आली.